ePaper **महाजन यांनी आपल्या विरोधात लोकसभेची निवडणूक लढवावी : खडसे**



| वर्ष - 7 । अंक - 238 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- निवृत्तीनंतर वॉर्नरचे मोठे विधान
- दीपिकाचे आई होण्याचे संकेत
- काँग्रेसचा पंतप्रधान मोदींवर निशाणा!
- ठाकरे गटाचा मोदींना टोला


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 7 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आमच्या 'प्रयोगाची' इतिहासात नोंद!

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : नाट्य संमेलनात फटकेबाजी

। पिंपरी ।महाईन्यूज ।।

**कलेच्या क्षेत्रात एखादा उपक्रम दरवर्षी 100 वर्षे करत राहणे हे सोपे काम नाही. हे केवळ मराठी माणसाच्या रंगणभूमीवरील प्रेमामुळे शक्य झाले. राजकारणात देखील काही धाडसी प्रयोग होतात. आम्ही दीड वर्षांपूर्वी असाच प्रयोग केला आहे. त्याची इतिहासात नोंद होईल, अशी जोरदार फटकेबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**




ऐतिहासिक शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची चिंचवड येथील श्री मोरया गोसावी संकुल येथे सुरुवात झाली. 99 व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांच्या उपस्थितीत नटराज, घंटेचे पूजन करून संमेलनाचे उद्‌घाटन झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, संमेलनाचे स्वागत अध्यक्ष शरद पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, उमा खापरे, शंभराव्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, दिमाखदार सोहळा आयोजित केला आहे. कलेच्या क्षेत्रात एखादा उपक्रम दरवर्षी 100 वर्षे करत राहणे हे सोपे काम नाही. हे केवळ मराठी माणसाच्या रंगणभूमीवरील प्रेमामुळे शक्य झाले. मराठी प्रेक्षक दर्दी आणि चोकंदळ आहे. खरे तर हे शंभरावे संमेलन दोन वर्षांपूर्वी होणे अपेक्षित होते. परंतु, करोनामुळे झाले नाही. कदाचित नियतीच्या मनात असेल की एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतरच शंभरावे संमेलन व्हावे आणि 100 व्या संमेलनाला मला मुख्यमंत्री म्हणून उपस्थित राहता आले.

> नाटक हे ज्ञान आणि मनोरंजनाचे साधन आहे. निखळ मनोरंजन करणारी, आशयप्रधान आणि वास्तवावर भाष्य करणारी नाटकं व्हायला हवीत. प्रायोगिक व व्यावसायिक, बाल रंगभूमीला विशेष अनुदान राज्य सरकारने दिले पाहिजे. तसेच ज्येष्ठ कलाकारांच्या मानधनात वाढ करावी, तिकीट दरात कपात व्हावी.
>
> **- शरद पवार,** अध्यक्ष, राष्ट्रवादी.

> आज प्रामुख्याने मी नाटकात येऊ इच्छित असलेल्या मुलांसाठीचा महत्वपूर्ण विषय मांडत आहे. मात्र त्यांना त्यासाठीचा खर्च त्यांनीच उभा करायचा आहे, हा खर्च ५ ते ७ कोटी रुपयांचा आहे, प्रत्येक विद्यापीठाला तो झेपणारा नाही यामुळे राज्य सरकारने प्रत्येक विद्यापीठाच्या नाट्य विभागाला अनुदान दिले पाहिजे.
>
> **- जब्बार पटेल,** अध्यक्ष, नाट्य संमेलन.



# बच्चा है पर मन का सच्चा है!

## अजित पवारांचं रोहित पवारांना गाण्यातून प्रत्युत्तर

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आमदार रोहित पवारांच्या मालकीच्या बारामती अ‍ॅग्रोवरील ईडीच्या कारवाईनंतर आता राज्याचं राजकारण तापत असल्याचं चित्र आहे. मी काही चुकीचं केलं असतं तर देशात परत आलो नसतो, अजितदादांसोबत भाजपमध्ये गेलो असतो अशी प्रतिक्रिया रोहित पवारांनी दिली. शुक्रवारी ईडीने बारामती अ‍ॅग्रोवर धाड टाकली होती. त्यानंतर रोहित पवारांनी आज पत्रकार परिषद घेत भाजपवर हल्लाबोल केला.**

गेल्या सात दिवसामागे दिल्लीला कोण कोण गेलं होतं त्याची माहिती घ्या, त्यामध्ये भाजपचे आणि अजित पवारांचे कोण सोबती गेले होते याची माहिती घ्या. त्यानंतर सर्व घटनाक्रम लक्षात येईल असं रोहित पवार म्हणाले. आपण काही चुकीचं केलं असतं तर देशात परत आलोच नसतो, अजितदादांसोबत भाजपमध्ये गेलो असतो असंही रोहित पवार म्हणाले. दरम्यान, रोहित पवारांच्या या टीकेला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिलं. रोहित पवारच्या प्रश्नाला उत्तर द्यावं, इतका तो मोठा झालेला नाही, तो बच्चा आहे, त्यावर माझे प्रवक्ते बोलतील असं ते म्हणाले. ईडीने कारवाई केली त्यावेळी आपण परदेशात होतो. मी काही चुकीचं केलं असतं तर मी आज सकाळी लगेच आलो नसतो. अधिकाऱ्यांचं काही चुकत नाही. ज्या गोष्टी मला माहित नाहीत त्या मिडीयाकडून कळतंय. हा विषय ईडी आणि आमच्यातील विषय होता. पण काहींना राजकारण करायचं आहे. रोहित पवार म्हणाले की, आमच्यासाठी महाराष्ट्राची अस्मिता महत्त्वाची आहे. महाराष्ट्र धर्म आणि विचार महत्त्वाचा आहे. यात काही नेते आमच्या कंपनीत घोटाळा



झाल्याचं मोठ्या आवाजात सांगत आहेत. यात काही मनी लॉंड्रिंगचा काही विषय नाही. ईडीच्या अधिकाऱ्यांवरही आपला काही आक्षेप नाही. आमच्याकडून त्यांना पूर्ण सहकार्य असेल. या आधी ज्यांच्यावर ईडीने कारवाई केली त्यांची यादी एकदा पब्लिश करा. आता ते नेते त्याच पक्षात आहेत की भाजपमध्ये गेलेत याचीही माहिती घ्या. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या शहरात असतात, त्या शहरात दिवसाढवळ्या खून होतात. फडणवीस यांनी कोणतेतरी एकच पद सांभाळावं. त्यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली. आम्ही ईडीच्या अधिकाऱ्यांना व्यवस्थितपणे सहकार्य केले. ईडीच्या अधिकाऱ्यांबाबत माझा कोणताही आक्षेप नाही. मात्र आज आमच्यावर कारवाई होत आहे. ज्यांच्यावर भाजपने आरोप केले होते. त्यांच्यावरील कारवाया का थांबवण्यात आल्या आहेत? असा सवालही रोहित पवार यांनी केला. शुक्रवारी बारामती अ‍ॅग्रो कंपनीची ईडीकडून 14 तास चौकशी करण्यात आली. ईडीचे अधिकारी या कंपनीचे काही कागदपत्रे घेऊन गेल्याची सूत्रांची माहिती आहे. रोहित पवारच्या (Rohil Pawar) प्रश्नाला उत्तर द्यावं इतका मोठा तो झालेला नाही,तो अजून बच्चा आहे. त्यावर माझे प्रवक्ते बोलतील, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी (Ajit Pawar) रोहित पवारांच्या टीकेवर केली. रोहित पवारांच्या बारामती अ‍ॅग्रो (Baramati Agro) या कंपनीवर ईडीने छापेमारी केली. त्यानंतर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया देत म्हटलं होतं की, जर मी काही चुकीचं केलं असतं तर अजित पवारांसोबत भाजपात गेलो असतो. त्यावर अजित पवार यांनी प्रतिक्रिया देण्यास स्पष्ट नकार दिल्याचं पाहायला मिळालं. रोहित पवार यांच्या बारामती अ‍ॅग्रो या कंपनीवर छापेमारी केली. यामुळे रोहित पवारांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता असल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहेत. त्यातच अजित पवारांवर त्यांनी केलेल्या टीकेमुळे अजित पवार गटही आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. पण यावर अजित पवारांनी कोणतीही ठोस प्रतिक्रिया दिली नाही. दरम्यान यावेळी बोलताना अजित पवार यांनी आमदार कांबळे यांच्यावर देखील भाष्य केलं. आमदार कांबळे यांनी माझ्या समोर कोणाला मारलं असतं तर मी शांत बसलो असतो का? मी पुढच्या कार्यक्रमाच्या घाईत होतो. त्यामुळं राष्ट्रगीत होताच बाहेर पडलो, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. पुण्यातीलससून रुग्णालयातील एका कार्यक्रमादरम्यान भाजपचे आमदार सुनील कांबळे यांनी राष्ट्रवादीच्या जितेंद्र सातव यांच्या कानशिलात लगावल्याचा प्रकार समोर आला होता.

### तर मी शांत बसलो असतो का?

» 100 व्या नाट्यसंमेलनामध्ये अनेक नाट्यमयी घडामोडी पाहायला मिळाल्या. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन सोहळ्याला शरद पवार आणि अजित पवार या दोघांनाही आमंत्रण देण्यात आलं होतं. पण या दोघांनीही या सोहळ्याला गैरहजेरी लावली. त्यामुळे चर्चांना उधाण आलं. पण आजच्या नाट्यसंमेलनाच्या दुसऱ्या अंकात शरद पवार यांनी उपस्थिती लावली मात्र अजित पवार उपस्थित नव्हते. यावर अजित पवारांनी म्हटलं की, आजच्या 100व्या नाट्य संमेलनावेळी मी वेगळ्या कार्यक्रमात होतो. शरद पवार साहेब तिथं होतो म्हणून मी आलो नाही, असं काही नाही. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मध्ये पवार साहेब असताना मी तिथं जातोच.

# वाफगावच्या किल्ल्याच्या संवर्धनासाठी एकत्र या!

## महाराजा यशवंतराव होळकरांचा राज्याभिषेकदिन उत्साहात

**।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दरवर्षीप्रमाणे यंदाही 6 जानेवारी रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले वाफगाव येथे महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन आणि गड संवर्धन भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला. यावेळी गजी नृत्य, मर्दानी खेळ, ढोल वादन आणि भंडाऱ्याच्या उधळणीने रंगत आणली. राज्याभिषेकाची संधी देण्यात आली होती, हे यंदाच्या कार्यक्रमाचे वेगळेपण. भूषणसिंहराजे होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य राज्याभिषेकाचा कार्यक्रम पार पडला.**

या कार्यक्रमासाठी यशवंतराव महाराजांवर (Maharaja Yashwantrao Holkar) आणि होळकर घराण्यावर प्रेम करणारे समाज बांधव, भगिनी, अनेक ऐतिहासिक घराण्यांचे वंशज, सामाजिक राजकीय क्षेत्रात कार्यरत मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, अठरा पगड जातीतील विविध संघटना, इतिहास प्रेमी मोठ्या संख्येने राज्य व देशभरातून उपस्थित होते. भूमीपूजनासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, सुनील देवधर, खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी मंत्री आमदार प्रकाश आवाडे, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, लष्कराचे काही अधिकारी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.



राजराजेश्वर चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांचे भारतीय इतिहासातील योगदान अद्वितीय आहे. जगभरात अजिंक्य मानल्या जाणाऱ्या इंग्रजांचा त्यांनी अनेक वेळा पराभव केला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची बीजं लढवय्या मनात पेरली. राजस्थान, माळवा, पंजाब, दिल्ली इतक्या भल्या मोठ्या प्रदेशात महाराजांनी इंग्रजांविरुद्ध युद्धे लढली. भारतमातेच्या रक्षणासाठी आपसातील मतभेद विसरुन देशभरातील सर्व राजा महाराजांना एकत्र येण्याचे आवाहन केले. इंग्रज यशवंतराव महाराजांना भारताचा नेपोलिअन म्हणत. महाराजांशी बिनशर्त संधी करण्याची इंग्रजांची मानसिकता होती. मात्र महाराजा यशवंतराव होळकर यांना स्वतंत्र हिंदुस्थान हवा होता. हा इतिहास तरुणांना प्रेरणादायी आहे. या पराक्रमी देशभक्त राजाचे जन्मस्थान असलेला वाफगावचा भुईकोट किल्ला सुभेदार मल्हारराव होळकर यांनी बांधून घेतला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या वास्तव्याने ही वास्तू पावन झाली आहे.

### हा सर्वांसाठी एक ऐतिहासिक दिवस

» ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार वाफगावचा किल्ला आज 250 वर्षांनंतर संवर्धित होत आहे हा सर्वांसाठी एक ऐतिहासिक दिवस आहे. यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे, ग्रामस्थांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, पर्यटन वाढेल असं आवाहन होळकर राजघराण्याचे वंशज भूषणसिंहराजे होळकर यांनी व्यक्त केली. त्यांच्याच नेतृत्त्वात 'होळकर राजपरिवारा' तर्फे राजराजेश्वर चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन केले जाते.

## लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे

# दातृत्व अन् दबंगगिरीही स्मरणात!

### महाआरोग्य विनामूल्य शिबिर म्हणजे ‘पुण्यकर्म’ : चंद्रकांत पाटील

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ माणूस गेल्याचे दुःख लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांच्या प्रत्येक हितचिंतकाला झाले. त्यांची योगासने, दबंगगिरी आणि दातृत्व याच्या आठवणी कायम निघतात. लक्ष्मण जगताप यांनी कायम लोकांच्या आरोग्यासाठी पुढाकार घेतला. त्याच धर्तीवर भव्य अटल महाआरोग्य विनामूल्य शिबीर आयोजित करण्यात आले.**




लाखो लोकांना याचा फायदा होईल”, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने आयोजित अटल महाआरोग्य शिबिराच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. यावेळी पाटील बोलत होते.यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, प्रदेश महासचिव विक्रांत पाटील, भाजपाचे संदीप खर्डेकर, संजीवीनी पांड्ये, आरोग्य सेवाचे सहसंचालक राधाकिशन पवार, डॉ. सचिन देसाई, डॉ. लक्ष्मण गोफणे आदी मान्यवर उपस्थित होते.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, एखादा आजार झाल्यावर आपल्याला कळत नाही. मात्र, त्याने भयानक रुग्ण झाल्यानंतर आपण हतबल होतो. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने देशातील १० कोटी कुटुंबाना ५ लाखापर्यंतचा आभा कार्ड दिले आहे. वैद्यकीय सेवेचे पुण्य अनेक जन्माचे पुण्य देते, असे असेच सुरू ठेवा, असे आवाहनही पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. सूत्रसंचालन नाना शिवले आणि आभार माजी महापौर माई ढोरे यांनी मानले.

#### हे व्रत असेच निरंतर सुरु रहावे

भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ म्हणाल्या की, कोविडने मानवाला आपल्या स्वास्थ्याची काळजी घ्यायला शिकवले. आरोग्याची तपासणी केली पाहिजे. सर्वांनाच रुग्णालयात जावून उपचार घेणे शक्य होत नाही. लाखो लोकांची सेवा अत्यंत अचूक केली जात आहे. एपिलेप्सीसारखा आजार, स्तनांचा कर्करोग, मॅमोग्राफी, सर्व्हायकल कॅन्सरसारख्या खर्चिक आजारांवर मोफत उपचार होत आहेत. दिव्यांगानाही साहित्य दिले जात आहेत. आरोग्यसेवेचे हे व्रत असेच निरंतर सुरू रहावे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

#### ‘ब्रेस्ट कॅन्सर’ तपासणी मोफत...

महिलांसाठी ‘ब्रेस्ट कॅन्सर’ची तपासणी करण्याची सुविधा असलेली ‘व्हॅन’ उपलब्ध केली आहे. त्याचा रिपोर्ट एका तासात मिळतो. पुण्यात प्रत्येक विधानसभा मतदार संघामध्ये ही व्हॅन फिरते. यासाठी कोणतेही शुल्क घेतले जात नाही. त्यांची देखभाल दुरूस्तीची आम्ही करतो. आता यामध्ये सर्वप्रकारच्या तपासणी करण्याची सुविधा आहे. ही सुविधा पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू करण्याची घोषणा यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील केली. त्याचे नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# वाकडमधील वादग्रस्त ‘टीडीआर’ ला स्थगिती

### मोशी येथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता मेळावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

। मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड येथील टीडीआर प्रकरणात पाणी मुरत आहे. त्यामुळे या प्रकरणाला स्थगिती दिली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोशीत दिली.वाकड, भुमकर चौक येथील महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक 4/38 हे ट्रक टर्मिनस व 4/38 (अ) हे पीएमपीएमएल डेपोसाठी आरक्षित आहे.**




विकास आराखड्यातील समावेशक आरक्षणांच्या तरतुदींनुसार भूखंड मालक विलास जावडेकर इन्फिनिटी प्रा. लि या संस्थेने महापालिकेसोबत सहा नोव्हेंबर 2023 रोजी एक करार केला. कंपनीने 87 हजार 318 चौरस मीटर बांधकाम करून देण्याच्या मोबदल्यात महापालिकेला सहा लाख 93 हजार 448 चौरस हस्तांतरित विकास हक्क देण्याचे ठरले. या बांधकामाला स्थापत्य विभागाने मंजुरी दिली. त्यानुसार बांधकामाचा खर्च 658 कोटी 26 लाख आहे. बांधकामाचे क्षेत्र 78 हजार 318 चौरस मीटर आहे. 65 हजार 80 रुपये प्रमाणे प्रति चौरस मीटर बांधकाम खर्चाला मान्यता दिली. प्रत्यक्षात 2023-24 च्या रेडी रेकनरनुसार हा दर 26 हजार 620 रुपये प्रतिचौरस मीटर होतो. कंपनीने 87 हजार 318 चौरस मीटर बांधकाम करून देण्याच्या मोबदल्यात महापालिकेला सहा लाख 93 हजार 448 चौरस हस्तांतरित विकास हक्क देण्याचे ठरले. या बांधकामाला स्थापत्य विभागाने मंजुरी दिली. परंतु, 38 हजार 640 रुपये प्रति चौरस मीटर जादा दराप्रमाणे प्रकल्पाचे अंदाजपत्रक फुगवले. त्यामुळेच हस्तांतरित विकास हक्कामध्ये मोठी वाढ झाली. 665 कोटी रुपयांचा टीडीआर मिळणे अपेक्षित असताना एक हजार 136 कोटींचा जादा (Pimpri) टीडीआर विकासकाला मिळणार आहे. यात 671 कोटींचा फायदा महापालिका अधिकाऱ्यांनी विकासकाला करून दिल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. वाकड येथील टीडीआर प्रकरणात पाणी मुरत आहे. त्यामुळे या प्रकरणाला स्थगिती दिली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोशीत दिली.

> “ शहराचे नुकसान होत असेल, निदर्शानास आले असेल आणि तिथे राज्य सरकारने नेमलेले अधिकारी असतील तर त्यांना आदेश देण्याचा सरकार म्हणून आम्हाला अधिकार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. मुख्यमंत्र्यांकडेही याबाबत तक्रारी गेल्या आहेत. सोमवारी त्यांच्याशी चर्चा करणार आहे. मुख्य सचिव नितीन करीर, असीम गुप्ता यांच्याकडून हे प्रकरण तपासून घेतले आहे. चार-पाच ठिकाणाहून माहिती घेतल्यानंतर पाणी मुरत असल्याने स्थगिती दिली आहे.
>
> **- अजित पवार,** उपमुख्यमंत्री.




# इतिहास घडवायचा..? भूगोल शिका!

**भूगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाट्य सादर होत असते' असे म्हटले जाते. परंतु भूगोल म्हणजे केवळ इतिहासातील घटना व साम्राज्यांचे उदयास्त यांची नेपथ्यरचना नव्हे. त्याचा अर्थ यापेक्षा कितीतरी व्यापक आहे. खडकांपासून ढगांपर्यंत, वनस्पतींपासून ते नदीपासून महासागरापर्यंत, उद्योग व्यापारापासून भूकंप, ज्वालामुखीपर्यंत असा भूगोलाचा व्यापविस्तार आहे.**



जीवनाशी संबंधित असा तो सर्वव्यापी, सर्वस्पर्शी विषय आहे. मानव आणि त्याचे पर्यावरण यांच्यातील आंतरक्रियेचा अभ्यास म्हणजे भूगोल. अर्थातच मानवी जीवन आणि एकूणच मानवी संस्कृतीला आकार देण्याचे व विकासाचे कार्य भूगोलातून घडते. यामुळे 'जे लोक भूगोल समजावून घेतात तेच इतिहास घडवू शकतात', असे म्हटले जाते. दुर्दैवाने आपण मात्र प्राचीन काळापासून भूगोलाला योग्य तो न्याय व महत्त्व दिलेले नाही. भूभागांचे संशोधन, स्थळातील अंतरे व नकाशे, रस्ते, भूरचनेची वर्णने, हवामान विषयक नोंदी, उत्पाती घटनांचा अचूक काळ व कालावधी यांच्या नोंदी, हे सर्व आपल्याकडे अभावानेच आढळते. १४०० वर्षांपूर्वी आर्यभट्टासारखा महान संशोधक आपल्याकडे होऊन गेला. पण त्याची पुरेशी दखल आपण घेतली नाही. अकराव्या शतकात अलबेरुनी या विद्वानाने आर्यभट्ट व वराहमिहिराच्या ग्रंथांचा फार्सी भाषेत अनुवाद केला. त्याच्याही पूर्वी आर्यभट्टाच्या ग्रंथाचा अरबीत अनुवाद झाल्याचा उल्लेख त्याने केला आहे. त्याच ग्रंथांचा मराठी अनुवाद उपलब्ध होण्यास विसावे शतक उजाडावे लागले. ३०० वर्षांपूर्वी राजा सवाई जयसिंह यांनी भारतात दिल्ली, जयपूर, वाराणसी आणि उज्जैन आणि मथुरा इथे वेधशाळा उभारल्या. प्रत्यक्षिक भूगोलाचे जागतिक आश्चर्य ठराव्या अशा आणि आजही वेध घेता येतील अशा या वेधशाळा. पण 'जंतर मंतर' या नावाने आज त्या केवळ शोभेच्या आणि त्याही उपेक्षित वास्तू म्हणून उभ्या आहेत. एकूण पूर्वीपासूनच काही क्षेत्रात मोठी प्रगती करताना आपण भूगोलाची उपेक्षा केली. ही चूक सुधारण्याचा अंशत: प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झाला. धरणे व सिंचन, रस्ते, उद्योगनिर्मिती या सर्व क्षेत्रातील विकासयोजना हे भूगोलाच्याच उपयोजनाचे प्रयत्न होते. परंतु हे करताना शिक्षणात मात्र आपण भूगोलाला योग्य ते स्थान दिले नाही. खरे तर स्वतंत्र भारतात तरी शिक्षणात स्वतंत्र विषय म्हणून भूगोलाला महत्त्वाचे स्थान देणे आवश्यक होते. पण गेली ७० वर्षे शालेय अभ्यासक्रमात 'सामाजिक शास्त्र' ( म्हणजे इ.भू. ना.शा.) या विषयाचा एक उपविषय – तोही १०० पैकी ४० गुणांचा – एवढेच स्थान भूगोलाला दिले गेले. परिणामी विद्यार्थी, शिक्षक आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेकडून या जीवनस्पर्शी विषयाच्या वाट्याला केवळ उपेक्षाच आली. या विषयाच्या पदवी व पुढील शिक्षणाची सोय अगदी मोजक्या महाविद्यालयात आहे. त्यामुळे भूगोलात विशेष रस असणारे, उच्चशिक्षित, पारंगत अध्यापक अभावानेच उपलब्ध आहेत. त्याची व्यापक, सखोल माहिती एकत्रितपणे भारतीय भाषेतून देणारी पुस्तके व संदर्भग्रंथ फारच कमी आहेत. खरे तर भारत हा कृषिप्रधान देश. शेती हवामानावर अवलंबून. हवामान व त्याची भाकिते हा भारतीयांच्या सर्वात जिव्हाळ्याचा विषय. त्यामुळे ढगांचे प्रकार, पर्जन्य, हवामानाचे आविष्कार, नैसर्गिक उत्पात, धरणे, सिंचन इ. ची माहिती इथे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना असणे अपेक्षित होते. या विषयावर शास्त्रीय माहिती व शिक्षण देणाऱ्या संस्था, शाळा सर्वत्र असायला हव्या. पण वास्तव विपरीत आहे. दुर्दैवाने ज्याची कमीतकमी शास्त्रीय माहिती व संशोधन संस्था उपलब्ध आहेत, असा हा विषय ठरला आहे. पण असे दुर्लक्ष फार महाग पडते, हेच आजवरच्या इतिहासाकडे पाहिल्यावर दिसून येते. ज्यांनी भूगोल व भौगोलिक ज्ञानाचे महत्त्व जाणले व ते आत्मसात केले, तेच सर्व क्षेत्रात यशस्वी ठरले. सिकंदर, नेपोलियन ते हिटलरपर्यंत अनेकांच्या पराभवात भौगोलिक ज्ञानाकडे दुर्लक्ष महत्त्वाचे ठरले. उलट आपल्या साधनसंपत्तीचा कौशल्याने वापर करणारे जपानसारखे देश विनाशानंतरही फिनिक्स ठरले. सोन्याच्या आणि हिऱ्याच्या खाणी असणारे आफ्रिकी देश गुलामीत खितपत राहिले. आणि स्वत:साठी अन्नही पिकवू न शकणारे, साधनसंपत्तीचा तुटवडा असणारे युरोपीय देश राज्यकर्ते बनले.

## संपादकीय »

# ...धाम सोडोनि द्यावे

***सरकारमुळे या वर्षीचे विज्ञान अधिवेशन पुढे ढकलले गेले असेल, पण या सरकारचे विज्ञानाशी किती जवळचे नाते आहे ते कधी नीट बघितले आहे का?***

दरवर्षी जानेवारीत होणारी भारतीय विज्ञान परिषद म्हणजेच इंडियन सायन्स काँग्रेसचे यंदाचे १०९ वे अधिवेशन पुढे ढकलले गेले म्हणून काही नतद्रष्ट मंडळी टीका करत आहेत. करोत बापडी, आपण त्यांच्याकडे कशाला लक्ष द्यायचे? कारण २०२१, २०२२ ही कोविडची दोन वर्षे वगळता १९१४ पासून अखंडपणे ही अधिवेशने सुरू आहेत, आता पैशांअभावी सरकारने असा निर्णय घेतला असेल तर त्यात काय चुकीचे आहे? महागाई सतत वाढते आहे. सगळ्याच गोष्टींचे दर आकाशाला भिडताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत आपण सर्वसामान्य माणसे नाही का एखादा खर्च पुढे ढकलत? कुणी घरखरेदी पुढे ढकलते, कुणी घरासाठीची एखादी मोठी खरेदी नंतर करू म्हणत मन मारते, कुणी एखादी सहल नंतर कधी तरी करू असे म्हणून घरीच बसते, तर कुणी अगदी लग्न वगैरेही पुढे ढकलून मोकळे होतात.

**इन्स्टाग्रामवर फोटोंचा पाऊस पडत असतो. व्हॉट्सअॅपवर किंवा फेसबुक, ट्विटर, टेलिग्रामवरही दृश्यं भरपूर. इतक्या मोठ्या प्रमाणावर दृश्यं पाहण्याची सोय कुठल्याही काळातल्या कुठल्याही मानवाला मिळाली नसेल, अशा काळात आपण जगतो. असंच पन्नास-साठ वर्षांपूर्वी रेडिओमुळे झालं होतं.**

# कलेच्या प्रत्ययाचं बावनकशी नाणं!



तेव्हाची माणसं आदल्या सर्व पिढ्यांपेक्षा जास्त ऐकू शकत होती! 'रेडिओ सिलोन' म्हटलं की हळवेबिळवे होणारे अद्यापही काही जण असतील. हिंदी सिनेसंगीत ऐकून ऐकून लोक गुणगुणू लागले, याचं कारण नभोवाणी. रेडिओतून कानांवर येणारं प्रत्येक गाणं ऐकून 'याचा अर्थ काय?' असं सर्वच जणांनी विचारलं नसेल... पण हे सर्वच जण स्वत:ला सिनेसंगीताचे रसिक मानणारे होते. काही जणांना 'रफ्ता रफ्ता वो मेरी हस्ती का सामाँ हो गए' (चित्रपट : हम कहाँ जा रहे है; गायक : महेंद्र कपूर, आशा भोसले) आणि आणखी काही जणांना 'रफ्ता रफ्ता देखो आँख मेरी लडी है' (चित्रपट : कहानी किस्मत की; गायक : किशोर कुमार) आठवेल. अगदी आवडीनं आठवेल. ही आवड कशातून आली? 'पुरवठ्यामुळे मागणी तयार होते' हे भांडवलशाहीचं तत्त्व रेडिओवरल्या फिल्मी गाण्यांबाबत लागू झालं होतं की काय? तसं असेल, तर मग चित्रकलेपासनं लोक दूर राहिले याला फक्त 'पुरवठा नाही' हे एकच कारण असू शकेल? पण महाराष्ट्रात तर नागपूरपासनं सांगली, औंध, कोल्हापूर, पुणे, मुंबई इथं चित्रकलेची उत्तम संग्रहालयं आहेत. मराठवाड्यातली अजिंठा लेणी जागतिक वारसा आहेत आणि इथं गुंफा क्रमांक एक ही भिंतीवरल्या चित्रांचीच तर आहे! पण तरीही चित्रांपासनं लोक (त्यातही मराठी वाचू-बोलू शकणारे लोक) लांबच राहिलेले दिसतात. चित्र समोर असलं तरी अनेक जण चित्रापासून मानसिकदृष्ट्या दूरच असतात. असं का झालं असावं? भारतीय कलांचा इतिहास फार म्हणजे फारच मोठा आहे आणि कलाविषयक चिंतनही भारतात पूर्वापार झालं आहे, त्यात 'रसिक' म्हणजे नवरसांपैकी जे रस कलाकृतीतून उद्भवतात त्यांचं नेमकं ग्रहण करणारी माणसं. पण मग हे रस-ग्रहण करण्यासाठी आधी 'अर्थ' कळावा लागतो, ही अट मुख्यत: संस्कृतात असलेल्या काव्यांनी (काव्यांनी) घातली. 'अर्थ कळला तरच आपण रसिक' या अलिखित सक्तीपुढे दबलेले लोक मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत आजही दिसतात. हे लोक प्रदर्शनाला जातात, चित्रकाराला गाठून 'एक्स्क्यूज मी हं, पण अर्थ काय याचा?' असं विचारतात. हेच लोक परदेशांतल्या संग्रहालयांमध्ये गेले तर तिथल्या चित्रांबद्दल गाईडचं ऐकून किंवा चित्रांसोबतची माहिती वाचून कृतकृत्य होतात. यापेक्षा निराळा मार्ग आपण शोधू शकतो. त्यासाठी हे सदर दर पंधरवड्याला लिहिलं जाईल. पण हे फक्त त्या विशिष्ट कलाकृतींचं रसग्रहण ठरू नये, याची काळजी घेतली जाईल. त्या कलाकृतींच्या निमित्तानं एकंदर दृश्यकलेच्या आणखी जवळ नेणारं काही तार्किक विवेचन होऊ शकतं का, असा प्रयत्न इथं असेल. दृश्यं (नुसतीच दृश्यं) हा तर जगण्याचा भाग आहेच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ईव्हीएमवरून ठाकरे गटाचा मोदींना टोला

## ईव्हीएमविषयी लोकांचा संताप उसळून येत आहे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत हे सातत्याने ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणूक घेण्याची मागणी करत आहेत. राऊत यांनी शनिवारी (६ डिसेंबर) पुन्हा एकदा तीच मागणी लावून धरली. खासदार राऊत यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, देशातील जनतेच्या मनात मतदान पद्धतीविषयी, ईव्हीएमविषयी संशय आहे. ईव्हीएमचा विषय आता हळूहळू सगळीकडे पोहोचला आहे. ईडी आणि ईव्हीएमवर लोकांचा राग आहे.**



पश्चिम बंगालमधील ईडीच्या पथकावर जमावाने केलेल्या हल्ल्याचा दाखला देत संजय राऊत म्हणाले, ईडी आणि ईव्हीएमविषयी लोकांचा संताप उसळून येत आहे. उद्या ईव्हीएमच्या बाबतीत जनता रस्त्यावर उतरली आणि अराजक माजलं तर त्याला सरकार जबाबदार असेल. जगात सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशात आहे, असं म्हटलं जातं. परंतु, ज्या मतदान प्रक्रियेवर जनतेचा विश्वासच नाही ती पद्धत चालवून तुम्ही कोणत्या प्रकारची लोकशाही या देशात लादू इच्छिता? भारतीय जनता पार्टीला आव्हान देत संजय राऊत म्हणाले, तुम्हाला जनतेचा इतका प्रचंड पाठिंबा आहे असा तुम्ही दावा करता. हे भाजपाचे लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विष्णूचा १३ वा अवतार मानतात. मोदींमध्ये प्रभू श्रीरामांना घर देण्याची ताकद आहे, असं सांगतात, मग तुम्ही मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला का घाबरता? तुम्ही विष्णूचे १३ वे अवतार आहात ना? मग मतपत्रिकेवर निवडणूक घ्या. मोदींना मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यात कसली भीती? तुम्ही जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला घाबरत असाल तर याचा अर्थ तुम्हाला पराभवाची भीती आहे. तुम्हाला माहिती आहे मतपत्रिकेवर निवडणूक घेतली तर ३३ कोटी देवही तुम्हाला वाचवू शकणार नाहीत. श्रीरामही वाचवणार नाहीत. खासदार राऊत म्हणाले, मतपत्रिकेवर निवडणुका होऊ लागल्या तर भाजपावाले ग्रामपंचायती आणि नगरपालिकेच्या निवडणुकाही जिंकू शकणार नाहीत, अशा प्रकारचं वातावरण या देशात तयार झालं आहे. या देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींचं राज्य नसून ईव्हीएमच्या माध्यमातून लादलेल्या हुकूमशाहीचं राज्य आहे हे आता स्पष्ट झालं आहे. त्यामुळे आपल्यासारख्या महाशक्तिमान राज्यकर्त्यांनी भीती न बाळगता मतपत्रिकेवर पुन्हा एकदा निवडणुका घ्यायला हव्यात. आजघडीला जगात कुठेही ईव्हीएमद्वारे निवडणूक घेतली जात नाही, अमेरिकेतही नाही, युरोपातल्या कुठल्या राष्ट्रात किंवा रशियातही नाही, मोदींच्या प्रिय इस्रायलमध्येही ईव्हीएमवर निवडणूक घेतली जात नाही. मग भारतात ईव्हीएमचा अट्टाहास का? मोदींमध्ये प्रभू श्रीरामांना घर देण्याची ताकद आहे, असं सांगतात, मग तुम्ही मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला का घाबरता? तुम्ही विष्णूचे १३ वे अवतार आहात ना? मग मतपत्रिकेवर निवडणूक घ्या. मोदींना मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यात कसली भीती? तुम्ही जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला घाबरत असाल तर याचा अर्थ तुम्हाला पराभवाची भीती आहे.पश्चिम बंगालमधील ईडीच्या पथकावर जमावाने केलेल्या हल्ल्याचा दाखला देत संजय राऊत म्हणाले,ईडी आणि ईव्हीएमविषयी लोकांचा संताप उसळून येत आहे. उद्या ईव्हीएमच्या बाबतीत जनता रस्त्यावर उतरली आणि अराजक माजलं तर त्याला सरकार जबाबदार असेल. जगात सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशात आहे, असं म्हटलं जातं. तुम्हाला माहिती आहे मतपत्रिकेवर निवडणूक घेतली तर ३३ कोटी देवही तुम्हाला वाचवू शकणार नाहीत.

### तुम्हाला पराभवाची भीती आहे

“भारतीय जनता पार्टीला आव्हान देत संजय राऊत म्हणाले, तुम्हाला जनतेचा इतका प्रचंड पाठिंबा आहे असा तुम्ही दावा करता. हे भाजपाचे लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विष्णूचा १३ वा अवतार मानतात. मोदींमध्ये प्रभू श्रीरामांना घर देण्याची ताकद आहे, असं सांगतात, मग तुम्ही मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला का घाबरता? तुम्ही विष्णूचे १३ वे अवतार आहात ना? मग मतपत्रिकेवर निवडणूक घ्या. मोदींना मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यात कसली भीती? तुम्ही जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला घाबरत असाल तर याचा अर्थ तुम्हाला पराभवाची भीती आहे. तुम्हाला माहिती आहे मतपत्रिकेवर निवडणूक घेतली तर ३३ कोटी देवही तुम्हाला वाचवू शकणार नाहीत. श्रीरामही वाचवणार नाहीत.वसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत हे सातत्याने ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणूक घेण्याची मागणी करत आहेत. राऊत यांनी शनिवारी (६ डिसेंबर) पुन्हा एकदा तीच मागणी लावून धरली. खासदार राऊत यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, देशातील जनतेच्या मनात मतदान पद्धतीविषयी, ईव्हीएमविषयी संशय आहे. ईव्हीएमचा विषय आता हळूहळू सगळीकडे पोहोचला आहे.

# विजय वडेट्टीवार म्हणाले, वाघनखं कधी येणार?

## सुधीर मुनगंटीवार म्हणतात, किती खाली जाऊन राजकारण करायचं!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (VIJAY WADETTIWAR) यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची (CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ) लंडनमधील वाघनखं (WAGH NAKH) भारतात कधी येणार? याबाबत ट्विटरवरून सुधीर मुनगंटीवारांना (SUDHIR MUNGANTIWAR) खोचक सवाल करत निशाणा साधला. त्यांच्या या टीकेला राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या खास शैलीत प्रत्युत्तर दिले आहे.**

आमचा प्रयत्न हा शिवरायांची जगदंबा तलवार भारतात आणण्यासाठी सुरु आहे. त्या प्रयत्नांना देखील यश येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाघ नखे आणि जगदंबा तलवार असा एकत्रित कार्यक्रम करण्याचा आमचा मानस आहे. आमच्या विरोधी पक्षनेत्याला काही काम शिल्लक राहिलं नसावं. त्यांनी एक फोन केला असता तरी, त्यांना मी माहिती देऊ शकलो असतो. मात्र किती खाली जाऊन राजकारण करायचं याचा आदर्श ते घालताय. अशा शब्दात सुधीर मुनगंटीवारांनी विजय वडेट्टीवारांच्या त्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. आमच्या विरोधी पक्षनेत्याला काही काम



शिल्लक राहिलं नसावं. विजय वडेट्टीवारांना आपल्या भागातील रस्त्यांसाठी फोन करता येतो. त्यांचप्रमाणे त्यांनी जर एक फोन केला असता, तर मी त्याना सगळी माहिती देऊ शकलो असतो. मात्र, किती खाली जाऊन राजकारण करायचं याचा आदर्श ते घालताय. या रिकाम्या कामांमुळे काँग्रेसला मायक्रोस्कोपनी पाहावं लागेल. त्यांच्यासाठी वाघनखं हा विषय गौण आहे. कारण नेहरूंच्या कार्यकर्त्यांची या संदर्भात काय भावना असू शकते, हे लक्षात येतं. अशा शब्दात सुधीर मुनगंटीवारांनी विजय वडेट्टीवार टोला लगावला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची लंडनमधील व्हिक्टोरिया अँड अॅल्बर्ट संग्रहालयात असलेली वाघनखं ही भारतात आणली जात आहे. आपल्या जाज्वल्य इतिहासातील अमूल्य ठेवा मायभूमीत परत यावा ही देशाच्या तमाम नागरिकांची इच्छा आहे. हे स्वप्नवत कार्याला यश देखील आले आहे. मात्र असे असतांना काही लोकांचे पोट का दुखतं याचं आश्चर्य आहे. येत्या 13 जानेवारीपासून आम्ही राज्याभिषेकाचा मोठा प्लान तयार केलाय. आमचा प्रयत्न शिवरायांची जगदंबा तलवार भारतात आणण्यासाठी सुरु आहे.

### पावनगड अतिक्रमण कारवाई

कदाचित त्या प्रयत्नांना देखील यश येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दोन्ही वस्तूंचा एकत्रित कार्यक्रम करण्याचा आमचा मानस आहे. असे देखील सुधीर मुनगंटीवार म्हणाले. धर्मांध आणि तुष्टीकरण करणारे लोकं याला धार्मिक रंग देतात. गड-किल्ल्यांच्या बाबतीत तरी हा भाव ठेवू नका. निवडणूक जिंकण्यासाठी इतर मार्गाचा अवलंब करा. हिंदू मंदिरांची देखील अतिक्रमणं हटवली जातात, त्यात नवल काय. त्यामुळे पावनगडावरील अनधिकृत कारवाई ही नियमांना धरून आहे. असे देखील सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

# काँग्रेसचा पंतप्रधान मोदींवर निशाणा!

## » महापुरुष लक्षद्वीपमध्ये जाऊन फोटो काढू शकतात

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लक्षद्वीपमधील (LAKSHDWEEP) फोटोंची (PHOTOS) काँग्रेसकडून (CONGRESS) खिल्ली उडवण्यात आली आहे. 'लक्षद्वीपमध्ये जाणून पाण्यात फोटो काढू शकता, मग मणिपूरमध्ये का जात नाहीत?', असा सवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे (MALLIKARJUN KHARGE) यांनी केला आहे. अलिकडे लक्षद्वीपच्या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवला. याचे फोटो त्यांनी सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यावरून विरोधकांनी मात्र, पंतप्रधानांवर निशाणा साधला आहे..**





### ...मग मणिपूरमध्ये का नाही?

» मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत या मुद्द्यावर भाष्य केलं. खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधत म्हटलं आहे की रोज सकाळी देवाचं दर्शन घ्यावं तसं ही व्यक्ती दर्शन देते, मग हे मणिपूरमध्ये का जात नाही. हे महापुरुष मणिपूरला का गेले नाहीत, जिथे लोक मरत आहेत, जिथे महिलांवर अत्याचार होत आहेत. जिथे लोकांचा थंडीत मृत्यू होतं आहे, अशा ठिकाणी ते जनतेची विचारपूस करायला जात नाहीत. का? ते देशाचा भाग नाहीत? तुम्ही लक्षद्वीपमध्ये जाणून पाण्यात फोटो काढू शकता, पण मणिपूरमध्ये जाऊन जनतेला समजावू शकत नाहीत?" असं म्हणत खरगे यांनी पंतप्रधानांच्या लक्षद्वीपमधील फोटोची खिल्ली उडवली आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत या मुद्द्यावर भाष्य केलं. खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधत म्हटलं आहे की, "नवनवीन कपडे घालून रोज वेगवेगळे फोटो काढतात. तुम्ही सर्वांनीच पाहिलं असेल. तुम्हालाही याचा कंटाळा आला असेल की, किती वेळा यांचं तोंड बघायचं. तरीही ते तोंड दाखवणं सोडत नाही आणि तुम्हीही त्यांचे फोटो काढणं सोडत नाहीत. आज लोकांना असं वाटत आहे की, हे नक्की काय चाललंय?" "रोज सकाळी देवाचं दर्शन घ्यावं तसं ही व्यक्ती दर्शन देते, मग हे मणिपूरमध्ये का जात नाही. हे महापुरुष मणिपूरला का गेले नाहीत, जिथे लोक मरत आहेत, जिथे महिलांवर अत्याचार होत आहेत. जिथे लोकांचा थंडीत मृत्यू होतं आहे, अशा ठिकाणी ते जनतेची विचारपूस करायला जात नाहीत. का? ते देशाचा भाग नाहीत? तुम्ही लक्षद्वीपमध्ये जाणून पाण्यात फोटो काढू शकता, पण मणिपूरमध्ये जाऊन जनतेला समजावू शकत नाहीत?" असं म्हणत खरगे यांनी पंतप्रधानांच्या लक्षद्वीपमधील फोटोची खिल्ली उडवली आहे.
यावेळी खरगे यांनी प्रश्न उपस्थित करत म्हटलं की, 'पूर्ण सत्ता तुमच्याकडे आहे. तुम्ही तर हेच सांगता की, मी देशात एकच असा व्यक्ती आहे, ज्यांना विरोधकही अडवू शकत नाहीत, असं त्यांनीच संसदेत सांगितलं आहे. जर एक मोदी विरोधकांसाठी पुरेसे आहेत, तर मणिपूरमध्ये जाऊन बघा, तिथली परिस्थिती बघा, असं का होतंय? तोही देशाचा भाग आहे. अजून किती दिवस तुम्ही याकडे दुर्लक्ष करणार आहात? म्हणून जनजागृती करण्यासाठी आम्ही यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे.'काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत या मुद्द्यावर भाष्य केलं. खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधत म्हटलं आहे की, "नवनवीन कपडे घालून रोज वेगवेगळे फोटो काढतात. तुम्ही सर्वांनीच पाहिलं असेल. तुम्हालाही याचा कंटाळा आला असेल की, किती वेळा यांचं तोंड बघायचं. तरीही ते तोंड दाखवणं सोडत नाही आणि तुम्हीही त्यांचे फोटो काढणं सोडत नाहीत.
आज लोकांना असं वाटत आहे की, हे नक्की काय चाललंय?" "रोज सकाळी देवाचं दर्शन घ्यावं तसं ही व्यक्ती दर्शन देते, मग हे मणिपूरमध्ये का जात नाही. हे महापुरुष मणिपूरला का गेले नाहीत, जिथे लोक मरत आहेत, जिथे महिलांवर अत्याचार होत आहेत. जिथे लोकांचा थंडीत मृत्यू होतं आहे, अशा ठिकाणी ते जनतेची विचारपूस करायला जात नाहीत. का? ते देशाचा भाग नाहीत? तुम्ही लक्षद्वीपमध्ये जाणून पाण्यात फोटो काढू शकता, पण मणिपूरमध्ये जाऊन जनतेला समजावू शकत नाहीत?" असं म्हणत खरगे यांनी पंतप्रधानांच्या लक्षद्वीपमधील फोटोची खिल्ली उडवली आहे. यावेळी खरगे यांनी प्रश्न उपस्थित करत म्हटलं की, 'पूर्ण सत्ता तुमच्याकडे आहे.

# बालिका गृहातून २६ मुली बेपत्ता

## » मध्यप्रदेशमधील धक्कादायक घटना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये नोंदणी नसलेल्या अनधिकृत बालिका गृहातून २६ मुली बेपत्ता झाल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. या मुली गुजरात, झारखंड, मध्य प्रदेशमधील सीहोर, रायसेन, छिंदवाडा, बालाघाट या जिल्ह्यातील राहणाऱ्या होत्या. विनापरवाना बालिका गृह चालविल्याबद्दल आता पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. राष्ट्रीय बाल आयोगाचे अध्यक्ष प्रियंक कानूनगो यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून राज्याचे मुख्य सचिव वीरा राणा यांना पत्र लिहून चिंता व्यक्त केली.**



प्रियंक कानूनगो यांनी काही दिवसांपूर्वी या बालिका गृहाला अचानक भेट दिली, तेव्हा हा प्रकार समोर आला. भोपाळमधील आंचल गर्ल्स हॉस्टेल हे परवालिया परिसरात येते. भोपाळ शहराच्या बाहेरील बाजूस हा परिसर आहे. कानूनगो यांनी जेव्हा बालिका गृहाची नोंदवही तपासली तेव्हा त्यात ६८ मुलींची नोंदणी आढळली. मात्र तपासणी केल्यानंतर त्यापैकी २६ मुली बेपत्ता असल्याचे आढळले. या गर्ल्स हॉस्टेलचे संचालक अनिल मॅथ्यू यांना याबाबत जेव्हा विचारणा केली, तेव्हा त्यांनी समाधानकारक उत्तरे न दिल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. एफआयआरमधील तक्रारीनुसार, सदर ठिकाणी अनेक गैरप्रकार होत असल्याचे आढळून आले आहेत. कानूनगो यांनी एक्स या सोशल मीडिया साईटवर यासंबंधी एक सविस्तर पोस्ट टाकली. ते म्हणाले, “मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथे राज्य बाल आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांसह एका अनधिकृत बालगृहाची पाहणी केली. रस्त्यावरील मुलांना उचलून त्यांना या बालिका गृहात टाकले गेले होते, याची कोणतीही माहिती सरकारला दिलेली नाही. इथे मुलांवर ख्रिश्चन धर्माचे संस्कार केले जात आहेत. या बालिका गृहात ६ वर्षांपासून ते १८ वर्षांपर्यंतच्या जवळपास ४० हून अधिक मुली हिंदू आहेत.” हे प्रकरण उजेडात आल्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, भोपाळच्या परवलिया पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात एक अनधिकृत बालिका गृह चालविले जात असून तिथून २६ मुली बेपत्ता झाल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणाची गंभीरता आणि संवेदनशीलता पाहता सरकारने त्वरीत कारवाई करावी, अशी माझी मागणी आहे.

# बिलकिस बानोच्या याचिकेवर सोमवारी निर्णय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

सर्वोच्च न्यायालयात बिलकिस बानो प्रकरणात ११ दोषींच्या सुटकेच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालय निर्णय देणार आहे. बिलकिस बानोच्या वकिलांनी ही याचिका दाखल करताना म्हटलं होतं की अजूनही बिलकिस बानो त्या प्रसंगाच्या धक्क्यातून सावरलेली नाही. अशात दोषी आरोपींची सुटका करण्यात आली. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणात प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालयाने नेमक्या कुठल्या निकषांवर ही सुटका केली ते विचारलं होतं. २७ फेब्रुवारी २००२ या दिवशी गुजरातच्या गोध्रा स्टेशनवर साबरमती एक्स्प्रेसचे डबे जाळण्यात आले होते. या ट्रेनमध्ये कारसेवक अयोध्येहून परतत होते. या घटनेत ५९ कारसेवकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर गुजरातमध्ये दंगल उसळली होती. या घटनेतून वाचवण्यासाठी बिलकिस बानोने तिच्या मुलीसह आणि कुटुंबासह आपलं गाव सोडलं होतं. बिलकिस बानो आणि तिचं कुटुंब जिथे लपलं होतं तिथे ३ मार्च २००२ या दिवशी २० ते ३० लोकांचा जमाव आला. त्यांच्या हातात तलवारी आणि काठ्या होत्या. त्यांनी या घरावर हल्ला केला. तसंच बिलकिस बानोवर सामूहिक बलात्कार झाला. ही भयंकर घटना घडली तेव्हा बिलकिस बानो पाच महिन्यांची गर्भवती होती. तिच्या घरातल्या सात कुटुंबीयांची हत्या करण्यात आली. त्यावेळी तिच्या कुटुंबातले सहाजण पळून गेले होते. या प्रकरणात सीबीआय कोर्टाने ११ जणांना दोषी ठरवण्यात आलं. या सगळ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

# देशाचा जिवंत असलेला आत्मा म्हणजे खरा हिंदुस्थान

आपल्या देशाची हजारो वर्षांची संस्कृती काही निवडणुकांमुळे आणि दोन-चार लोकांमुळे संपू शकत नाही. ती चालत आहे आणि कायम चालत राहील. या देशाचा एक आत्मा आहे, ज्याला कोणीही मारू शकत नाही. आणि हाच जिवंत असलेला आत्मा म्हणजे खरा हिंदुस्थान असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ गीतकार व संवादलेखक पद्मभूषण जावेद अख्तर यांनी नवव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात केले. जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या या महोत्सवात जावेद अख्तर यांची तरुण निर्माता-दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी प्रकट मुलाखत घेतली, त्यावेळी



अख्तर बोलत होते. प्रसिद्ध हिंदी चित्रपट दिग्दर्शक अनुभव सिन्हा, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक अशोक राणे, कलात्मक संचालक चंद्रकांत कुलकर्णी, संयोजक नीलेश राऊत, कवी गीतकार दासू वैद्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अख्तर म्हणाले, आपला समाज सध्या एका वळणावर उभा आहे आणि तिथून पुढे काय असणार आहे हे नीट दिसत नाही आहे. समाजवादी काळात सामान्य लोकांचं भलं करण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. ते काही प्रमाणात पूर्ण झालं, काही नाही झालं. त्यानंतर आर्थिक उदारमतवाद आला. तिथेही लोकांचं भलं करण्यासाठी काही योजना आणण्यात आल्या.

# दीपिकाचे आई होण्याचे संकेत

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण ( DEEPIKA PADUKONE ) आणि अभिनेता रणवीर सिंग हे एक लोकप्रिय कपल आहे. दोघांनीही बॉलीवूडमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. २०१८ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. आता त्यांच्या लग्नाला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत; पण त्यांना अजूनही कोणतेही अपत्य नाही, हे विशेष!. आता दीपिकाने केलेल्या एका वक्तव्यामुळे ती लवकरच गुड न्यूज देणार असल्याची चर्चा रंगली आहे. कुटुंब नियोजनावर ती व्यक्त झाली आहे. एका मुलाखतीत दीपिका म्हणाली की, आम्हा दोघांना लहान मुले खूप आवडतात. आम्हीही त्या दिवसाची वाट पाहत आहोत. त्यावेळी आमचे कुटुंब सुरू होईल. माझे नातेवाईक, मित्रपरिवार नेहमी म्हणतात की, माझ्यात जराही बदल झालेला नाही. हे माझ्यावरील संस्कारांमुळेच. सिनेसृष्टीत पैसे आणि प्रसिद्धीमुळे प्रभावित होणे सोपे आहे; पण घरात कोणीही मला सेलिब्रिटीसारखे वागवत नाहीत. मी सर्वात आधी मुलगी आणि बहीण आहे. रणवीर आणि मला ही आशा आहे की, आमच्या मुलाला लवकरच जन्माला घालू! असेही तिने म्हटलं आहे. बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण ( DEEPIKA PADUKONE ) आणि अभिनेता रणवीर सिंग हे एक लोकप्रिय कपल आहे. दोघांनीही बॉलीवूडमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. २०१८ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. आता त्यांच्या लग्नाला ५ वर्षे पूर्ण झाली आहेत; पण त्यांना अजूनही कोणतेही अपत्य नाही, हे विशेष!. आता दीपिकाने केलेल्या एका वक्तव्यामुळे ती लवकरच गुड न्यूज देणार असल्याची चर्चा रंगली आहे. कुटुंब नियोजनावर ती व्यक्त झाली आहे.



# नेहा पेंडसेच्या घरात ६ लाखांची चोरी

छोट्या पडद्यावरील 'भाबीजी घर पर हैं' ही मालिका चाहत्यांच्या घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत 'अनीता भाभी'ची मुख्य भूमिका मराठी अभिनेत्री नेहा पेंडसेने साकारली आहे. दरम्यान अनिता भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहा पेंडसेच्या घरातून ६ लाखांचा रुपयांची चोरी झाली आहे. नेहाच्या घरातील एका नोकराने ६ लाखांचे दागिने चोरून पळ काढलाय. यानंतर नोकराच्या विरोधात नेहाच्या पतीने शार्दुल पोलिसांत गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या नोकराचे नाव सुमित कुमार सोलंकी असे आहे. एका रिपोर्टच्या माहितीनुसार, 'भाबीजी घर पर हैं' मालिकेतील 'अनीता भाभी' म्हणजे, नेहा पेंडसे तिच्या पती शार्दुलसोबत अरिटो बिल्डिंग, वांद्रे पश्चिम, मुंबईत राहते. दरम्यान शार्दुलला घरातील ६ लाखांचे दागिने लंपास झाल्याची माहिती पोलिसांना दिली आणि घरातील नोकराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या तक्रारीत शार्दुलने चोरीला गेलेल्या वस्तुत सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी असल्याचे सांगितले आहे. दरम्यान पोलिसांनी घरातील सर्व नोकरांना बोलावून त्याची चौकशी केली. मात्र, या चौकशीदरम्यान नेहा पेंडसे घरात राहत असेलला नोकर सुमित कुमार सोलंकी बेपत्ता असून तो कुलाब्यात असल्याचे समजते. यानंतर पोलिसांनी त्याला फोनवरून या चोरीबद्दल विचारणा केली असताना त्यांने उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारावरून पोलिसांनी त्याच्यावर संशय घेत सुमितला अटक केली. मात्र, चोरीचे दागिने अद्याप सापडलेले नाहीत. दरम्यान त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ड्राइव्हरने दिलेल्या माहितीनुसार, नोकर सुमित सोलंकीची दागिन्यांवर नजर पडली आणि त्याने त्याच्यावर डल्ला मारला. नेहाच्या घरी सुमित इतर लोकांसोबत राहत होता. सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी या दोन्ही गोष्टी नेहाने शार्दुलला गिफ्ट केल्या होत्या. तर दुसरीकडे ही चोरीची घटना बाहेर कशी लीक झाली याबाबत नेहा आश्चर्यचकित व्यक्त करत आहे.



# सुरभी ज्योती लवकरच म्हणणार 'कुबूल है'?

सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपुर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.

# निवृत्तीनंतर वॉर्नरचे मोठे विधान

## » मला एक रोमांचक क्रिकेटर म्हणून लक्षात ठेवावे

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलिया संघाचा सलामीचा फलंदाज डेव्हिड वॉर्नरने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. तो म्हणाला की, लोकांनी मला एक मनोरंजक क्रिकेटर म्हणून लक्षात ठेवावे अशी माझी इच्छा आहे. डेव्हिड वॉर्नरच्या म्हणण्यानुसार, त्याला पूर्ण आशा आहे की तरुण मुलं त्याच्या करिअरमधून शिकतील आणि त्याच्या मार्गावर चालतील. डेव्हिड वॉर्नरने पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेपूर्वीच सांगितले होते की, सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यानंतर तो कसोटी फॉरमॅटला अलविदा करणार आहे. मात्र, मालिकेच्या मध्यावर त्याने कसोटी तसेच वनडेतून निवृत्ती जाहीर केली. डावखुऱ्या फलंदाजाने कसोटीच्या शेवटच्या डावात शानदार अर्धशतक झळकावले आणि आपल्या कारकिर्दीचा समारोप उत्तम पद्धतीने केला.**




तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर झालेल्या संवादादरम्यान डेव्हिड वॉर्नरने आपल्या कारकिर्दीत त्याला कसे लक्षात ठेवायला आवडेल हे सांगितले. अनुभवी फलंदाज म्हणाला, "लोकांनी मला एक रोमांचक आणि मनोरंजक क्रिकेटर म्हणून लक्षात ठेवावे अशी माझी इच्छा आहे. आशा आहे की मी ज्या पद्धतीने खेळलो त्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हसू आले. याशिवाय लहान मुलेही मी दाखवलेल्या मार्गावर चालतील अशी आशा आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटपासून कसोटीन क्रिकेटपर्यंतचा प्रवास खूप चांगला होता. कसोटी सामने खेळण्यासाठी मेहनत करत राहा, कारण त्यात खूप मजा येते." याशिवाय वॉर्नरने असेही सांगितले की, कुटुंब त्याच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. तो म्हणाला, "कुटुंब तुमच्या आयुष्याचा एक मोठा भाग आहे. तुम्ही जे करता ते त्यांच्या पाठिंब्याशिवाय करू शकत नाही. सुंदर आणि अद्भुत संगोपनाचे श्रेय मी माझ्या पालकांना देतो. मी माझा भाऊ स्टीव्हच्या पावलावर पाऊल टाकले. त्यानंतर माझी पत्नी कँडिस माझ्या आयुष्यात आली. आमचे एक सुंदर कुटुंब आहे आणि मी त्यांच्यासोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेतो. मी त्यांच्यावर खूप प्रेम करतो. याविषयी पुढे बोललो तर मी खूप भावूक होईन." सिडनी येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ८ विकेट्सनी पराभव केला. पाकिस्तानने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी केवळ १३० धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे त्यांनी खेळाच्या चौथ्या दिवशी दोन गडी गमावून सहज गाठले. अशा प्रकारे डेव्हिड वॉर्नरने त्याच्या शेवटच्या सामन्यात विजय मिळवून कसोटी क्रिकेटला अलविदा केला. ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानविरुद्धची तीन सामन्यांची कसोटी मालिका ३-० ने जिंकली. सिडनी येथे झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीत कांगारू संघाने ८ गडी राखून विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाचा अनुभवी सलामीवीर डेव्हिड वॉर्नरसाठी हा सामना खूप खास होता. खरे तर हा त्याच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना होता. वॉर्नरने त्याच्या शेवटच्या कसोटी डावात अप्रतिम अर्धशतक झळकावले. पॅव्हेलियनमध्ये जाताना त्याने आपले हेल्मेट आणि ग्लोव्ह्ज एका मुलाला भेट दिले. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. डेव्हिड वॉर्नरने कसोटी कारकिर्दीतील शेवटच्या डावात अप्रतिम फलंदाजी केली. त्याने सिडनी क्रिकेट ग्राउंडवर पाकिस्तानविरुद्ध ७५ चेंडूत ७ चौकारांच्या मदतीने ५७ धावा केल्या. अखेरच्या कसोटी डावात त्याला साजिन खानने बाद केले. वॉर्नर आऊट होताच सिडनी क्रिकेट ग्राऊंडवर उपस्थित खेळाडूंसह चाहत्यांनीही उभे राहून त्याचे कौतुक केले. पॅव्हेलियनमध्ये परतताना डेव्हिड वॉर्नरने त्याचे हेल्मेट आणि ग्लोव्ह्ज एका मुलाला भेट दिले. तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर झालेल्या संवादादरम्यान डेव्हिड वॉर्नरने आपल्या कारकिर्दीत त्याला कसे लक्षात ठेवायला आवडेल हे सांगितले.

### डेव्हिड वॉर्नरने जिंकली मनं

» क्रिकेट डॉट कॉम एयूने डेव्हिड वॉर्नच्या बाद झाल्यापासून तो ड्रेसिंग रूममध्ये जाईपर्यंतचा एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो एका मुलाला त्याचे हेल्मेट आणि ग्लोव्हज देताना दिसत होता .डेव्हिड वॉर्नरची ही कृती पाहून चाहते खूप खूश झाले आणि ऑस्ट्रेलियन फलंदाजाचे खूप कौतुक करत आहेत. शेवटच्या कसोटीनंतर वॉर्नरकडून हेल्मेट आणि ग्लोव्ह्ज मिळाल्यानंतर हा छोटा चाहता खूप आनंदी दिसत होता. त्याच्या आवडत्या फलंदाजाने त्याला हेल्मेट आणि ग्लोव्ह्ज भेट दिले, यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान डेव्हिड वॉर्नरनेही एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. आता तो ऑस्ट्रेलियन संघाकडून फक्त टी-२० खेळताना दिसणार आहे. वॉर्नर हा ऑस्ट्रेलियन क्रिकेट इतिहासातील दिग्गज सलामीवीरांपैकी एक आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत अनेक मॅचविनिंग इनिंग्स खेळल्या आहेत.ऑस्ट्रेलिया संघाचा सलामीचा फलंदाज डेव्हिड वॉर्नरने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर मोठी प्रतिक्रिया दिली आहे.

# चेतेश्वर पुजाराचे टीकाकारांना चोख प्रत्युत्तर

## » सौराष्ट्रकडून खेळताना झळकावले शानदार अर्धशतक

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुजाराला त्याच्या कामगिरीमुळे खूप टीकेला सामोरे जावे लागले होते. त्याला भारतीय कसोटी संघातूनही वगळण्यात आले. मात्र पुजाराने आपली मेहनत थोडीही कमी केली नाही. आता त्याने आपल्या बॅटने टीकाकारांना चोख उत्तर दिले आहे. पुजाराने सौराष्ट्रकडून खेळताना रणजी ट्रॉफी २०२३-२४ मध्ये दमदार अर्धशतक झळकावले आहे. त्याने अर्पित वसावडासोबत मजबूत भागीदारीही केली आहे.**

वास्तविक, राजकोटमध्ये सौराष्ट्र आणि झारखंड यांच्यात रणजी करंडक सामना खेळला जात आहे. या सामन्यात झारखंडचा संघ पहिल्या डावात केवळ १४२ धावा करत सर्वबाद झाला. त्याला प्रत्युत्तर म्हणून सौराष्ट्र संघ आता फलंदाजी करत आहे. सौराष्ट्रकडून पुजारा चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने शानदार कामगिरी करत अर्धशतक झळकावले. पुजाराने १२५ चेंडूंचा सामना करत नाबाद ८५ धावा केल्या आहेत. वृत्त लिहेपर्यंत त्याने ८चौकार मारले होते. पुजारामुळे सौराष्ट्र



संघ मजबूत स्थितीत पोहोचला आहे. या सामन्यात सलामीवीर हार्विक देसाईने सौराष्ट्रला शानदार सुरुवात करून दिली. हार्विकने ११९ चेंडूंचा सामना करत ८५ धावा केल्या. त्याच्या खेळीत १४ चौकारांचा समावेश होता. स्नेल पटेलने १५ धावांची खेळी केली. शेल्डन जॅक्सननेही अर्धशतक झळकावले. जॅक्सनने ७४ चेंडूंचा सामना करत ५४ धावा केल्या. त्याने ८ चौकार आणि एक षटकार मारला. पुजाराने जॅक्सनसोबत चांगली भागीदारी केली. त्याने अर्पितसोबत चांगली भागीदारीही केली. वृत्त लिहिपर्यंत अर्पितने ३३ धावा केल्या होत्या. वृत्त लिहिपर्यंत सौराष्ट्रने ८१ षटकांनंतर ३ गडी गमावून २९६ धावा केल्या होत्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यात सेंच्युरियन आणि केपटाऊनच्या उसळत्या खेळपट्ट्यांवर टीम इंडियाचे फलंदाज निष्प्रभ ठरत असताना चेतेश्वर पुजारा सोशल मीडियावर ट्रेंड झाला होता. अय्यरला संघातून वगळून पुजाराचा कसोटी संघात समावेश करण्याची मागणी चाहत्यांनी केली. यामागे पुजाराच्या परदेशातील अनेक संस्मरणीय खेळी खेळल्या आहेत.

### जॅक्सननेही अर्धशतक झळकावले

» हार्विकने ११९ चेंडूंचा सामना करत ८५ धावा केल्या. त्याच्या खेळीत १४ चौकारांचा समावेश होता. स्नेल पटेलने १५ धावांची खेळी केली. शेल्डन जॅक्सननेही अर्धशतक झळकावले. जॅक्सनने ७४ चेंडूंचा सामना करत ५४ धावा केल्या. त्याने ८ चौकार आणि एक षटकार मारला.